॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
ज्या घरात आई आणि बाप असतात,
तेच घर खरं स्वर्ग असतं!

अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ४१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

# मुंबई, दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग

## एकनाथ शिंदे दिल्लीत, जयंत पाटील वर्षा बंगल्यावर

**● मुंबई/नवी दिल्ली । वीरभूमी –** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर राजधानी दिल्ली आणि मुंबईत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मंगळवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाकरे गटातील बंडखोर खासदारांना सोबत घेऊन दिल्लीत दाखल झाले असून, रात्री उशिरा ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे समजते. दरम्यान, मुंबईत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील आणि अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांनी रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर दाखल झाले. त्यामुळे या नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा झाली, याबाबत उलटसुलट चर्चा रंगली आहे.



संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी राजधानी दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यातच आगामी अधिवेशनात महिला आरक्षणासोबत मतदारसंघ पुनर्रचना विधेयक नव्याने मांडले जाणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त खासदारांचे पाठबळ मिळवून बहुमताने हे विधेयक मंजूर करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे जास्तीत जास्त खासदार फोडून एनडीएला बळ मिळवून देण्यासाठी नेते कामाला लागले आहेत. यातूनच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाला भगदाड पाडले. त्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाला धक्का देण्याची तयारी सुरू झाल्याचे सूत्रांचे म्हणणे होते.

दरम्यान, मंगळवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे खासदारांना घेऊन दिल्लीत दाखल झाले आणि ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत गुफ्तगू करणार आहेत. त्याचवेळी मुंबईत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील रात्री उशिरा मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर दाखल झाले. विशेष म्हणजे तत्पूर्वी जयंत पाटील आणि अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे नेते सुनिल तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची एकत्रित बैठक झाली आणि त्यानंतर ते मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेल्याचे समजते. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत वर्षा बंगल्यावर नेमकी काय चर्चा झाली, याबाबत उलटसुलट चर्चा आहे.

शरद पवार पक्षाचे जयंत पाटील आणि अजित पवार पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांनी वर्षा बंगल्यावर जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सव्वातास चर्चा केली आहे. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, हे मात्र गुलदस्त्यात आहे.

### शरद पवार गट एनडीएसोबत?

■ शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मंगळवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा बंगल्यावर जाऊन भेट घेतली. त्यामुळे शरद पवार गट एनडीएसोबत जाणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, शरद पवार पक्षाचे काही आमदार आणि खासदार भाजपसोबत जायला उत्सुक असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काय निर्णय घेते, हे पाहावे लागेल.

## SPOT NEWS

### सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावली

**● नवी दिल्ली –** नीट पेपरफुटी आणि सीबीएसईमधील गोंधळाप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लडाखमधील सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दिपके गेल्या काही दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. जंतरमंतरवर सुरू असलेल्या या उपोषणाला '३ इडियट्स' या सुपरहिट चित्रपटातील 'चतुर रामलिंगम' म्हणजेच अभिनेता ओमी वैद्य याने जाहीर पाठिंबा दिला आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या 'कॉक्रोच जनता पार्टी' या संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, उपोषणादरम्यान वांगचुक यांचे वजन तब्बल ८ किलोने कमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. याच पार्श्वभूमीवर ओमी वैद्यने सोशल मीडियावर एक व्हीडीओ शेअर करत देशवासीयांना या संवेदनशील विषयावर बोलण्याचे आवाहन केले. मला फुन्सुक वांगडूने मरावे असे वाटत नाही, असे ओमी वैद्य आपल्या व्हीडीओमध्ये म्हटले आहेत.

### पंढरपुरात मटण-मास विक्रीवर प्रशासनाची कडक बंदी

**● पंढरपूर –** आषाढी वारीसाठी पंढरपुरात विठू माऊलीच्या दर्शनाला येणा-या लाखो वारक-यांसाठी प्रशासनाने एक अत्यंत मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पंढरपूर शहर आणि आजूबाजूच्या परिसरात उद्यापासून (१५ जुलै) थेट २९ जुलै पर्यंत असे १५ दिवस मांस आणि मटण विक्रीवर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनंतर जिल्हाधिका-यांनी हे कडक आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे पंढरपुरातील खवय्यांची अडचण होणार असली, तरी लाखो वारकरी आणि भाविकांमधून या निर्णयाचे जोरदार स्वागत केले जात आहे. आषाढी यात्रेच्या काळात दररोज लाखो वारकरी पंढरपुरात विठ्ठल दर्शनासाठी पायी चालत येत असतात. या पवित्र काळात शहरातील विविध भागांत सुरू असणाऱ्या मांस आणि मटण विक्रीमुळे भाविकांच्या धार्मिक भावना दुखावू नयेत, यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या नव्या नियमांनुसार, पुढील १५ दिवस म्हणजेच १५ जुलै ते २९ जुलै या वारीच्या काळात पंढरपूर शहर आणि परिसरात कुठेही मांस किंवा मटणाची विक्री करता येणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## वाढवण बंदराजवळ आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

**● मुंबई । वीरभूमी–** पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील दापचरी येथे ५५८.४३ हेक्टर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या निर्णयाची माहिती दिली. आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार प्रकल्प महाराष्ट्रातील शेतक-यांना जागतिक बाजारपेठेशी थेट जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरेल असा विश्वास रावल यांनी यावेळी व्यक्त केला.

वाढवण बंदरापासून अवघ्या ४० किमी अंतरावर उभारण्यात येणारा हा प्रकल्प फ्रान्समधील रुंगीस मार्केट, नेदरलँड्समधील रॉयल फ्लोरा हॉलंड तसेच रॉटरडॅम बंदर परिसरातील आधुनिक



कृषी लॉजिस्टिक व्यवस्थेच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे. देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करणारे जागतिक दर्जाचे कृषी व्यापार केंद्र म्हणून त्याची उभारणी केली जाईल, असे रावल यांनी सांगितले. राज्यात आंतरराष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अशी त्रिस्तरीय विपणन व्यवस्था विकसित करण्याचे नियोजन असून त्यातून कृषी मालाच्या मूल्यसाखळीला बळकटी मिळणार आहे. निर्यात बाजार सुविधांचे एकत्रीकरण, काढणीनंतरचे मूल्यवर्धन, संगणकीकृत तसेच पारदर्शक व्यवहार आणि आधुनिक बाजार पायाभूत सुविधा यावर विशेष भर दिला जाणार असल्याची माहिती रावल यांनी दिली.

दापचरी येथील केंद्रामध्ये घाऊक व्यापार, आयात-निर्यात सुविधा, शीतसाखळी व्यवस्था, ग्रेडिंग आणि पॅकेजिंग, मल्टिमोडल लॉजिस्टिक व्यवस्था तसेच ॲग्रीटेक आणि एक्स्चेंज सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय वेअरहाऊसिंग, कोल्ड स्टोरेज, रिपनिंग चेंबर्स, गुणवत्ता परीक्षण सुविधा, कंटेनर टर्मिनल, रेल्वे सायडिंग, ई-लिलाव व्यवस्था आणि निर्यात सुलभता केंद्र उभारण्याचे नियोजन असल्याचे रावल म्हणाले.

## सरसकट कर्जमाफीवर राज्य मंत्रिमंडळाचे बैठकीत शिक्कामोर्तब

**● मुंबई । वीरभूमी–** राज्य सरकारच्या महात्मा जोतीराव फुले शेतकरी सन्मान २०१९ च्या योजनेतील लाभार्थी शेतक-यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात केली होती. या निर्णयावर आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयामुळे १३ लाख शेतक-यांना लाभ मिळणार आहे. याशिवाय सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी २०१९ च्या योजनेतील लाभार्थी शेतक-यांना ५० हजार ऐवजी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचे जाहीर केले होते. या पार्श्वभूमीवर आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या निकषात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या निकष सुधारणेमुळे २०१९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची ५० हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून त्यांना नियमित कर्जमाफी मिळणार आहे. तर सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' सरकारने यापूर्वीच जाहीर केली आहे.

# एसटी महामंडळाच्या जागा ९८ वर्षांसाठी भाडेपट्ट्याने मिळणार

## राज्य मंत्रिमंडळाची मान्यता । राज्यात ३५०० एकर जागा

**● मुंबई । वीरभूमी –** राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या मालकीच्या मालमत्तांचा खासगीकरणातून विकासाची परवानगी देणाऱ्या मुद्रीकरण धोरणास मंगळवार दि. १४ जुलै रोजी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच एसटी महामंडळाकडील अतिरिक्त जागा विकासासाठी भाडेपट्ट्याने देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. विविध योजनांमुळे तिजोरीवर येणाऱ्या भारामुळे सरकार बेजार असून विकासासाठी आता खासगीकरणाचा आधार घेण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. नवीन धोरणामुळे जागांची लीज होणार आहे. पण मालकी सदैव एसटी महामंडळाचीच असणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या मालकीच्यामालमत्तांचाखाजगीकरणातून विकासाची परवानगी देणाऱ्या धोरणास आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जागा, इमारती, व्यावसायिक संकुले, बाजारपेठा, सार्वजनिक सुविधा, तसेच इतर स्थावर मालमत्तांचा नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने विकास करून त्यातून उत्पन्न वाढविणे, हा या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे. या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वत:चे शाश्वत आर्थिक स्रोत उपलब्ध होतील. त्यामुळे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि इतर नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी उभारणे शक्य होणार आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानावरील अवलंबित्व कमी होऊन स्थानिक संस्थांची आर्थिक स्वायत्तता अधिक बळकट होईल, असे सरकारचे म्हणणे आहे.

मालमत्तांच्या विकासासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी तसेच अन्य योग्य विकास मॉडेलचा अवलंब करता येणार असून सर्व प्रक्रिया पारदर्शक, स्पर्धात्मक आणि नागरिकहिताला प्राधान्य देणा-या पद्धतीने राबविण्यात येणार आहेत. राज्यात सध्या २९ महानगरपालिका, १५ अ वर्ग नगरपरिषदा, ७८ ब वर्ग नगरपरिषदा, १४६ क वर्ग नगरपरिषदा आणि ७४३ नगरपंचायती कार्यरत आहेत. या सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या धोरणाचा लाभ होणार असून त्यांच्या आर्थिक क्षमतेत वाढ होऊन नागरी विकासाला अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे. हे धोरण ३१ जुलै २०३१ पर्यंत किंवा नवीन धोरण येईपर्यंत लागू राहील.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताब्यातील अतिरिक्त जागांच्या विकास करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरणातून सवलत देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे एसटीच्या जमीनी भाडेपट्ट्याने देता येतील व त्यावरील विकास प्रकल्पाना गती मिळेल. एसटी महामंडळाची एकही जागा विकली जाणार नाही. दीर्घ मुदतीच्या विकासाची आपण योजना तयार केली आहे. त्यानुसार जागांची लीज होणार आहे. पण मालकी सदैव एसटी महामंडळाचीच असणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### राज्यात ३५०० एकर जागा

■ महामंडळाच्या राज्यात सुमारे ८५० ठिकाणी ३५०० एकर जागा आहे. यातील बऱ्याचश्या जागा मध्यवर्ती ठिकाणी आहेत. त्या सार्वजनिक खाजगी सहभागा अंतर्गत विकसित करून महामंडळास नियमित उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. त्यातील काही जागांचा वापर बस स्थानक सुविधांसह अनुषंगिक वाणिज्य स्वरूपाचा तर काही जागा पूर्णत: रहिवाशी स्वरूपाच्या आहेत. या जागांचा वापर व्यावसायिक वापर करून महामंडळास फायदा मिळणे शक्य आहे.

# SPOT NEWS

## निवृत्तीनाथ महाराज दिंडीचे डोंगरे सामाजिक संस्थेच्या वतीने स्वागत

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी सोहळ्याचे शहरातील मार्केट यार्ड परिसरात स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय, निमगाव वाघा यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते दिंडीतील रथाचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी किसान पतसंस्थेचे सचिव महादेव पाचारणे, संगीता पाचारणे, दत्ता सातपुते, पै. संदीप डोंगरे यांच्यासह भाविक उपस्थित होते. पै. नाना डोंगरे म्हणाले की, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, अध्यात्माचा आणि सामाजिक एकात्मतेचा अमूल्य वारसा आहे. विठ्ठलाच्या भेटीसाठी हजारो वारकरी पायी प्रवास करतात. या विठ्ठलभक्तांचे स्वागत करणे आणि त्यांची सेवा करणे हे प्रत्येकासाठी मोठे भाग्य आहे. वारकरी परंपरेने समाजाला समता, बंधुभाव, संयम आणि निस्वार्थ सेवेची शिकवण दिली आहे. ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. पै. किसनराव डोंगरे यांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून आमची संस्था सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. वारकऱ्यांच्या स्वागताचा हा उपक्रमही त्याच सेवाभावातून आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

## तिसऱ्या नरेंद्रजी फिरोदिया चषक मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

शुक्रवार १७ जुलै रोजी अहिल्यानगर च्या, लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, एसटी स्टँड रोड येथे तीसरी नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय सतराशे पेक्षा कमी मानांकित खेळाडूंसाठी बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाअध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली. या स्पर्धेत भारतातून खेळाडू बुद्धिबळ खेळण्यासाठी येणार असून आत्तापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, तेलंगाना इत्यादी राज्यातून तीनशे च्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. लौकरच येणारा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिवस तसेच गुरुपौर्णिमा याचे औचित्य साधून वरील स्पर्धा आयोजित केली आहे. नरेंद्र फिरोदिया यांनी आजपर्यंत बुद्धिबळा साठी दिलेल्या योगदानाला वंदन म्हणून त्यांच्या नावाची ही तीसऱ्यांदा स्पर्धा आयोजित होत आहे असे अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले. साडेचार वर्षाचा बाळ खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपल्या बुद्धीचे बळ पणाला लावणार आहेत. शुक्रवारी १७ जुलै रोजी सकाळी १०.०० वाजता ह्या स्पर्धचे शुभारंभ होणार असून. त्यानंतर स्पर्धा सुरू होणार आहे या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत. रविवारी दुपारी ४.००वा तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक बुद्धिबळ स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. या स्पर्धेत विविध गटात पाच लाख रुपयांची प्रोत्साहन पर रोख बक्षिसे, आकर्षक ७० करंडक व सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र सुद्धा देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जळगाव) हे असून त्यांना पवन राठी (पुणे), शार्दुल टापसे (सातारा),दीपक चव्हाण (वाशिम), शिशिर इंदुरकर (नागपूर), प्रशांत घगेकर, देवेंद्र ढोकळे (नगर)आदी सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत.

# खाकीतली माणुसकी : बाबासाहेब बडे यांचा प्रेरणादायी सेवाधर्म

## नवोदय अनाथ व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊ, कपडे, शालेय साहित्याचे वाटप

■ **अनिल खाटेर**

● **पाथर्डी । वीरभूमी –**



समाजात काही व्यक्तींची ओळख त्यांच्या पदामुळे नव्हे, तर त्यांनी जपलेल्या माणुसकीमुळे निर्माण होते. त्यांच्या हातून होणारी मदत ही केवळ दान नसून अनेकांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरते. अशीच संवेदनशील ओळख पाथर्डी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब बडे यांनी आपल्या निःस्वार्थ सेवाभावातून निर्माण केली आहे.

कर्तव्य बजावताना कायद्यापुढे कठोर असलेले बाबासाहेब बडे गरजवंतांप्रती मात्र तितकेच हळवे आहेत. याच भावनेतून त्यांनी पाथर्डी येथील नवोदय अनाथ व मतिमंद विद्यालयाला भेट देऊन विद्यार्थ्यांना खाऊ, कपडे, गणवेश, शालेय साहित्य व इतर आवश्यक वस्तूंचे वाटप केले. तसेच संस्थेच्या सेवाकार्यासाठी सुमारे ५५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली.

या उपक्रमामागे प्रसिद्धीचा कोणताही मोह नव्हता. छायाचित्रांची गर्दी, सोशल मीडियावरील प्रदर्शन किंवा टाळ्यांचा गजर नव्हता; होती ती केवळ एका संवेदनशील मनाची निःस्वार्थ भावना.

अनाथ, दिव्यांग आणि मतिमंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हीच खरी ईश्वरसेवा असल्याचा संदेश त्यांच्या कृतीतून मिळतो. मुलांच्या डोक्यावर ठेवलेला आपुलकीचा हात आणि त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले निष्पाप हास्य हे कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठे असल्याचे या प्रसंगातून जाणवले.

खाकी वर्दी म्हणजे केवळ शिस्त, कायदा आणि कठोरता नव्हे, तर समाजाच्या दुःखात सहभागी होणारे संवेदनशील हृदयही असते, हे बाबासाहेब बडे यांनी कृतीतून दाखवून दिले. वंचित, अनाथ आणि दिव्यांग घटकांप्रती असलेली त्यांची सामाजिक बांधिलकी ही अनुकरणीय आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात, जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले; तोचि साधू ओळखावा, देव तेथेंचि जाणावा. बाबासाहेब बडे यांच्या कार्यात या अभंगाचा प्रत्यय येतो.

आजच्या स्वकेंद्रित युगात दुसऱ्याच्या आनंदासाठी स्वतःचा वेळ, पैसा आणि भावना खर्च करणारी माणसेच समाजाचा खरा आधार ठरतात. अशी माणसे पुरस्कारांची अपेक्षा ठेवत नाहीत; निराधारांच्या चेहऱ्यावर फुलणारे हसू हाच त्यांचा सर्वात मोठा सन्मान असतो.

चंदनाचा सुगंध जसा लपून राहत नाही, तशीच निःस्वार्थ सेवाही समाजाच्या मनात कायमची घर करून अनेकांना माणुसकीचा मार्ग दाखवत राहते. हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब बडे यांची ही कृती केवळ मदत नसून माणुसकीवरील विश्वास अधिक दृढ करणारी आणि समाजाला संवेदनशीलतेची नवी दिशा देणारी ठरली आहे. अशा देवदूतांमुळेच आजही जगात माणुसकी जिवंत असल्याचा दिलासा मिळतो.

## जिल्हास्तरीय कनिष्ठ गट ज्युनिअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय कनिष्ठ गट मैदानी स्पर्धा अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२०२७' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आगामी १ आणि २ ऑगस्ट २०२६ रोजी लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पार पडणार असल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व क्वालिफायिंग स्टँडर्ड्स पूर्ण करणाऱ्या खेळाडूंची डेरवण (जि. रत्नागिरी) येथे दिनांक २७ ते ३० ऑगस्ट रोजी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे.

या स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करणे बंधनकारक असून, २८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत अधिकृत संकेतस्थळावर (https://register.smrsports.com/ Competition/-hilyanagaršDistrictšJuniorš-thleticsšMeetš2026) प्रवेशिका जमा करता येतील. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १४, १६, १८ आणि २० वर्षांखालील अशा चार वयोगटांचा समावेश असून, खेळाडूचे वय किमान १२ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

खेळाडूंनी वय पडताळणीसाठी येथे येताना सक्षम प्राधिकाऱ्याचा जन्माचा दाखला (ज्याची नोंदणी जन्मानंतर दोन वर्षांच्या आत झालेली असावी), १० वीचे बोर्ड प्रमाणपत्र आणि आधार कार्ड ही मूळ कागदपत्रे सोबत आणणे गरजेचे आहे. शनिवार, १ ऑगस्ट रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून स्पर्धा स्थळी ऑनलाइन नोंदणी केलेल्या खेळाडूंना चेस्ट नंबरचे वाटप केले जाईल. स्पर्धा संपल्यानंतर चेस्ट नंबर जमा केल्यावर सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल, तर वयाची पडताळणी झाल्यानंतर आणि संबंधित खेळ प्रकारात किमान ४ खेळाडू असल्यास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

## १५ दिवसांत समस्या न सुटल्यास मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात बैठा सत्याग्रह

### पालिका प्रशासन व ठेकेदारांच्या मनमानीविरोधात प्रशांत शेळके यांचा इशारा

● **पाथर्डी । वीरभूमी–**



■ छाया । अनिल खाटेर

शहरात मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या विकासकामांतील नियोजनाच्या अभावामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासन व संबंधित ठेकेदारांकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत, आगामी १५ दिवसांत परिस्थितीत सुधारणा न झाल्यास मुख्याधिकारी यांच्या दालनात बैठा सत्याग्रह करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शेळके यांनी दिला आहे.

प्रभाग क्रमांक ६ तसेच शहरातील विविध नागरी समस्यांसंदर्भात शेळके यांनी मुख्याधिकारी संतोष लांडगे यांना निवेदन दिले. त्यामध्ये बंदिस्त गटार व पाणीपुरवठा योजनेच्या कामांमध्ये समन्वय नसल्याने एकाच रस्त्याची वारंवार खोदाई होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना पाच ते सहा महिने खड्डेमय रस्त्यांवरून प्रवास करावा लागत असून वाहतूक, अपघात आणि दैनंदिन हालअपेष्टांना सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद आहे.

निवेदनात शहरातील खड्डेमय रस्ते तातडीने दुरुस्त करावेत, कमी दाबाने व दुर्गंधीयुक्त येणाऱ्या पाणीपुरवठ्याची समस्या त्वरित सोडवावी, अष्टवाडा परिसरासह शहरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बंदिस्त गटारी व चेंबरची तातडीने साफसफाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच पालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारींची दखल घ्यावी आणि ठेकेदारांच्या कामांवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशीही मागणी शेळके यांनी केली आहे.

आगामी १५ दिवसांत या मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास मुख्याधिकारी यांच्या दालनात अचानक बैठा सत्याग्रह करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# दध्नेश्वर शिवालयाची आषाढी पायी दिंडी पंढरपूरकडे रवाना

## शेवगावात वारकऱ्यांचे जल्लोषात स्वागत । मिष्टान्न भोजन, कीर्तन व मोफत वैद्यकीय तपासणी

● **शेवगाव । वीरभूमी–**

दध्नेश्वर शिवालय, दहिगाव ने (ता. शेवगाव) येथून आषाढी पायी वारीचे मंगळवारी (दि. १४) सकाळी संस्थेचे अध्यक्ष सुदाम आदमाने महाराज यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे प्रस्थान झाले. सायंकाळी दिंडी शेवगाव शहरात दाखल झाल्यानंतर वारकऱ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

दिंडी परंपरेला २५ वर्षांची परंपरा असून, तिची सुरुवात स्व. मारुतराव घुले पाटील आणि स्व. कृष्णदेव काळे महाराज यांनी केली होती. त्यानंतर माजी आमदार नरेंद्र घुले, माजी आमदार चंद्रशेखर घुले, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा राजश्री घुले आणि माजी सभापती क्षितीज घुले यांनी ही परंपरा अखंड सुरू ठेवली आहे.

यंदाच्या दिंडीत दहिगाव ने, रांजणी, खामगाव, भावीनिमगाव, शहरटाकळी, देवटाकळी, मठाचीवाडी आदी गावांतील ११० पुरुष व १५० महिला वारकरी सहभागी झाले असून, मार्गात ही संख्या आणखी वाढणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

शेवगावातील ब्रम्हा सिटी येथे व्यापारी बापूसाहेब गवळी व सौ. अश्विनी गवळी यांनी दिंडीचे स्वागत करून वारकऱ्यांसाठी मिष्टान्न भोजनाची व्यवस्था केली. यावेळी अशोक पारठे महाराज यांचे कीर्तनही संपन्न झाले.

तसेच इनरव्हील क्लबच्या वतीने डॉ. मनिषा लड्ढा, रुपाली तळवलकर, सुनीता गवळी आणि डॉ. नेहा कांबळे यांनी वारकऱ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले.

यावेळी तहसीलदार आकाश दहाडदे, नायब तहसीलदार गौरी कट्टे, डॉ. गणेश चेके, डॉ. हरिश्चंद्र गवळी, विठ्ठल थोरात, दिग्विजय पाटील, भैय्या फडके, दीपक अभंग, गणेश बोरा, बबनराव गायकवाड, गणेश काकडे, बापुराव मगरे, डॉ. संजय लड्ढा, भगिनाथ काटे, ओम धूत यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

बुधवारी सकाळी चिखलीचे उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आणि नगरसेवक सुनील काकडे यांनी वारकऱ्यांना चहा-नाश्ता दिल्यानंतर दिंडी पुढील मार्गासाठी रवाना झाली.

ही पायी दिंडी पाथर्डी, पानाची देवाळली, बाभुळगाव, चापडगाव आणि टेंभुर्णी मार्गे पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे. दिंडीमुळे संपुर्ण परिसरातील वातावरण भक्तीमय झाले होते.



■ छाया । अमोल कराळे

# SPOT NEWS

## आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात परवानगी घेऊन तक्रार देण्यासाठी गेलेल्या मुस्लिम महिलांवरच गुन्हा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

सोशल मीडियावर मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारे तसेच दोन समाजांमध्ये धार्मिक तेढ व सामाजिक असंतोष निर्माण होईल, असे कथित वक्तव्य केल्याचा आरोप असलेल्या नाझिया इलाही खान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करणाऱ्या मुस्लिम महिलांवरच बेकायदेशीरपणे गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय देण्याची मागणी मुस्लिम समाजातील महिलांनी पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, नाझिया इलाही खान यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारे कथित वक्तव्य केले होते. या प्रकरणी कायदेशीर कारवाई व्हावी, या मागणीसाठी २९ जून २०२६ रोजी मुस्लिम समाजातील महिला भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात एक जुलैला पोलीस अधीक्षक कार्यालयावर जाण्यासाठी परवानगी घेण्याचे पत्र देण्यासाठी गेले होते व परवानगी चे पत्र सही शिकणे देखील घेण्यात आलेले आहे. मुस्लिम महिलांचा शिष्टमंडळ पोलीस अधीक्षक यांच्याकडे गेले असता यावेळी शेख नसीम खान यांनी पोलीस अधीक्षकांशी दूरध्वनीवर संपर्क साधून भेटीची विनंती केली. पोलीस अधीक्षक कामानिमित्त बाहेर असल्याने त्यांनी अप्पर पोलीस अधीक्षक कलबुर्गी यांची भेट घेऊन निवेदन देण्याचे सांगितले. त्यानुसार महिलांनी अप्पर पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन संपूर्ण घटना सांगितली आणि नाझिया इलाही खान यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी केली. मात्र, ज्या व्यक्तीविरुद्ध कारवाईची मागणी करण्यात आली होती, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याऐवजी न्याय मागण्यासाठी गेलेल्या मुस्लिम महिलांवरच गुन्हा दाखल करण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा आणि कायदेशीर मार्गाने तक्रार करण्याचा अधिकार दिला आहे. अशा परिस्थितीत न्याय मागणाऱ्या महिलांनाच आरोपी ठरविणे योग्य आहे का, असा सवालही महिलांनी उपस्थित केला आहे.

## चोंडेश्वरवाडीतील उषा साठे गोळीबार प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

माळशिरस तालुक्यातील अकलूज जवळील चोंडेश्वरवाडी येथे उषा साठे या महिलेवर झालेल्या कथित गोळीबार प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी दलित महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, उषा साठे या त्यांच्या पतीसोबत अनेक वर्षांपासून जगन्नाथ देशमुख यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करत होते. ६ जुलै रोजी शेतामध्ये काम करण्यासाठी गेले असता किंचाळण्याचा आवाज आला व तेथे जाऊन पाहिल्यावर उषा साठे यांच्या डोक्यात गोळी लागली होती. यापूर्वीही संबंधित आरोपींविरोधात महिलांवरील अत्याचारासह विविध तक्रारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणाचा जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी, शासनाच्या वतीने पिडीत कुटुंबाला आर्थिक मदत करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. हे निवेदन दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. काशिनाथ सुलाखे पाटील, जिल्हाध्यक्ष संजय चांदणे, जिल्हा कार्याध्यक्ष कडुबाबा लोढे, ज्येष्ठ नेते नामदेवराव चांदणे, महिला जिल्हा अध्यक्ष अरुणाताई कांबळे, आशाताई सुलाखे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मंदाकिनी मेंगाळ, चंद्रकांत सकट, नानाभाऊ कांबळे, वरूण वाघमारे, आकाश लोखंडे, नानाभाऊ कांबळे, सुभाष सुलाखे, अशोक सुलाखे, सनी जगधने, लक्ष्मण साबळे यांच्यासह संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळाली नुकसान भरपाई

### आ. आशुतोष काळेंच्या पाठपुराव्यापुढे बहुराष्ट्रीय कंपनी झुकली

**● कोपरगाव । वीरभूमी –**

नामांकित बहुराष्ट्रीय (मल्टी नॅशनल) बियाणे उत्पादक कंपनीकडून फसवणूक झाल्यानंतर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणे ही दुर्मीळ बाब मानली जाते. मात्र कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त शेतकरी याबाबत काहीसे सुदैवी ठरले असून आमदार आशुतोष काळे यांच्या निर्णायक भूमिकेमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सिजेंटा कंपनीकडून तब्बल ६ लाख २६ हजार ४०० रुपयांची नुकसान भरपाई मिळाली आहे.



■ छाया । जनार्दन जगताप

याबाबत सविस्तर वृत्त असे की, चालू हंगामात कोपरगाव मतदार संघातील अनेक शेतकऱ्यांनी विविध नर्सरीमधून सिजेंटा कंपनीच्या 'सिंबा' वाणाची टरबूज रोपे खरेदी करून लागवड केली होती. मात्र या वाणाची रोपे निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. तसेच या वाणाला रोगप्रतिकारक क्षमता कमी असल्याने मोठ्या प्रमाणावर रोगाचा प्रादुर्भाव झाला आणि अनेक एकरांवरील टरबूज पिकाचे मोठे नुकसान झाले होते. या प्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने २५ मार्च रोजी प्रत्यक्ष शेतात पाहणी करून अहवाल सादर केला. या अहवालात सिजेंटा कंपनीच्या 'सिंबा' वाणामुळे संबंधित शेतकऱ्यांचे शंभर टक्के नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले. तसेच कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचाही उल्लेख करण्यात आला होता.

शेतकऱ्यांवरील अन्यायाची दखल घेत आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. निकृष्ट दर्जाची रोपे पुरवून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनीवर कठोर कारवाई करून नुकसानग्रस्तांना न्याय मिळावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच कृषी विभागाने सातत्याने पाठपुरावा करण्याच्या व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेपर्यंत प्रयत्न सुरू ठेवण्याच्या सूचना तालुका कृषी अधिकारी अधिकाऱ्यांना दिल्या.

आमदार आशुतोष काळेंचा रेटा व कृषी विभागाच्या पाठपुराव्याच्या एकत्रित प्रयत्नातून अखेर सिजेंटा कंपनीने माघार घेत ७.२० हेक्टर क्षेत्रावरील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकूण ६ लाख २६ हजार ४०० रुपयांची नुकसानभरपाई अदा केली. याबाबतची माहिती तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांनी नुकत्याच झालेल्या कृषी विभागाच्या बैठकीत आमदार आशुतोष काळे यांना दिली. बहुराष्ट्रीय बियाणे कंपनीकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची घटना अत्यंत दुर्मीळ असून, अशा प्रकारचा निर्णय प्रथमच झाल्याचे कृषी विभागातील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या कारवाईमुळे कोपरगाव मतदारसंघातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यात कोणतीही कंपनी शेतकऱ्यांची फसवणूक करण्यापूर्वी दहा वेळा विचार करेल, अशी भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# रंगार गल्लीसह प्रभागातील नादुरुस्त चेंबरची समस्या मार्गी



सौ. दिपाली बंग यांच्या पाठपुराव्यामुळे गैरसोय दूर

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील जुनी पोलीस लाईन, रंगार गल्ली परिसरातील गटारीवरील चेंबर नादुरुस्त झाल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत परिसरातील नागरिकांनी माजी उपनगराध्यक्ष तथा प्रभागाच्या माजी नगरसेविका सौ. दिपाली रामनाथ बंग यांच्याकडे तक्रार केली. तक्रारीची तात्काळ दखल घेत त्यांनी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून चेंबर दुरुस्तीचे काम सुरू करून घेतले.

गोविंद देखणे, दत्तात्रय देखणे, विकास देखणे, संजय देखणे, कृष्णा देखणे, अशोक देखणे, सुनील देखणे व सुदाम देखणे यांनी नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीची माहिती सौ. बंग यांना दिली होती. त्यानंतर एक कॉल... प्रॉब्लेम सॉल्व्ह या कार्यपद्धतीनुसार कोणताही विलंब न करता दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आली.

पाथर्डी नगरपरिषदेच्या देखभाल व दुरुस्तीचे ठेकेदार शुभम भावसार यांच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून चेंबरची दुरुस्ती केली. यावेळी माजी नगरसेवक रामनाथ बंग तसेच गोविंद देखणे व अशोक देखणे यांनी उपस्थित राहून कामाची पाहणी केली.

या दुरुस्तीमुळे परिसरातील नागरिकांची दीर्घकाळची समस्या मार्गी लागली. तात्काळ कार्यवाहीबद्दल नागरिकांनी सौ. दिपाली रामनाथ बंग, रामनाथ बंग तसेच नगरपरिषदेच्या संबंधित यंत्रणेचे आभार मानले.

# शेवगाव सायकल असोसिएशनची पंढरपूर सायकल वारी उत्साहात

### शेवगाव-पाथर्डीतील ६० सायकलपटूंचा सहभाग

**● शेवगाव । वीरभूमी–**

आषाढी वारीनिमित्त शेवगाव सायकल असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेली पंढरपूर सायकल वारी यंदाही भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. गेल्या सात वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या उपक्रमात यावर्षी शेवगाव व पाथर्डी येथील ६० सायकलपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



■ छाया । अमोल कराळे

पंढरपूर येथे राज्यभरातील सुमारे चार हजारांहून अधिक सायकलपटू एकत्र आले होते. विठ्ठलनामाच्या गजरात पार पडलेल्या भव्य सायकल रिंगण सोहळ्याने भक्तिभाव, शिस्त आणि उत्साहाचे अनोखे दर्शन घडविले.

या वारीचे आयोजन असोसिएशनचे अध्यक्ष विनोद ठाणगे, डॉ. मुकुंद दारकुंडे आणि खजिनदार वसंत सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. वारीत विविध क्षेत्रांतील डॉक्टर, उद्योजक, व्यावसायिक, महिला सायकलपटू तसेच लहान मुलांनीही उत्साहाने सहभाग घेतला. सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देत भक्ती आणि सायकलिंगचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला.

शेवगाव क्लबमधून डॉ. दिपक वैद्य, संतोष भराट, दुर्गेश काथवटे, मच्छिंद्र आधाट, विनोद शेळके, निलकंठ लबडे, डॉ. शिल्पा देहाडराय, सिद्धेश देहाडराय, ज्ञानेश्वर बडे, कैलास जाधव, संभाजी कोठुळे, डॉ. जगदीश कुलकर्णी, डॉ. निखिल काकडे, संतोष भागवत, डॉ. मुकुंद दारकुंडे, लक्ष्मण बिटाळ, शंकर गरड, यशवंत तुपे, सुनील गवळी, डॉ. प्रदीप उगले, डॉ. स्मिता उगले, वेदिका उगले, हरिश्चंद्र वांढेकर, सोमनाथ नारळकर, बंडोपंत दहातोंडे, शिरीष घनवट, प्रदीप बोडखे, बाळासाहेब देशपांडे, हर्षवर्धन देशपांडे, निलेश केवळ, रवी पंडित, विनोद ठाणगे, सचिन मुळे, कांतीलाल खेडकर, वसंत सुरवसे, भागनाथ काटे, डॉ. संजय लड्डा, डॉ. योगेश फुंदे, सोहम देहाडराय आणि सिद्धांत देशपांडे यांनी सहभाग घेतला.

तर पाथर्डी क्लबमधून सचिन वांढेकर, योगेश शिंदे, मयुर रोडी, प्रसाद रोडी, दर्शन रोडी, अनिल दिनकर, प्रणव भोसले, शुभम तांबे आणि सुभाष पवार यांनी सायकल वारीत सहभागी होत विठ्ठल चरणी सेवा अर्पण केली.

आध्यात्मिक भक्ती, शारीरिक तंदुरुस्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ही सायकल वारी शेवगाव परिसरात विशेष कौतुकाचा विषय ठरली.

# श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

### हजारो भाविकांच्या जयघोषात आषाढी वारीला प्रारंभ । विविध दिंड्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**● पाथर्डी । वीरभूमी –**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्याचे आषाढी एकादशीनिमित्त सोमवारी (दि. १३) दुपारी ३ वाजता पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले.

श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातील पहिल्या पायी पालखी सोहळ्याची परंपरा सुरू केली होती. भगवानगडाच्या स्थापनेपासून आजतागायत ही परंपरा अखंडपणे सुरू आहे.

पालखीचा मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, आवार पिंपरी, कुर्डुवाडी आणि ढेकळेवाडी येथे होणार असून अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये दाखल होणार आहे.

प्रस्थानापासून पंढरपूरपर्यंतच्या प्रवासात अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगाव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा व बोरकिन्ही ग्रामस्थ, भायेश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगाव, सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासार, मायंबा संस्थान भालगाव, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, निरंजन संस्थान एकनाथवाडी, सुदर्शनगड संस्थान पाटणसांगवी, जय हनुमान संस्थान राणेगाव, दुर्गाशक्तीगड भिलवाडे, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी, शहरटाकळी, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी आणि संत भगवानबाबा संस्थान तागडगाव यांसह अनेक दिंड्या सहभागी झाल्या.

ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या प्रस्थान सोहळ्यास गडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री, प्रधानाचार्य ह.भ.प. वेदांताचार्य नारायण महाराज शास्त्री, आमदार मोनिकाताई राजळे, प्रतापराव ढाकणे, जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप तसेच विविध संस्थांचे महंत आणि भगवानगड परिसरातील हजारो भाविक उपस्थित होते.

पालखी सोहळ्यासाठी आलेल्या हजारो भाविकांसाठी सखाराम दादा खेडकर, भगवान भिवसेन खेडकर, गोरक्ष सानप (मालेवाडी), बाबुराव ढाकणे, गंगाधर ढाकणे (ढाकणवाडी), भानुदास जाधव (खरवंडी), हनुमंत खेडकर (दहिवंडी) आणि जालिंदर सानप (माळेगाव) यांनी डाळ-भट्टी, लापशी, जिरा राईस, वरण, आमटी व भाकरीची पंगत दिली. तसेच गजानन माधवराव कांगणे यांच्या वतीने दिवसभर हजारो भाविकांना मोफत चहाचे वाटप करण्यात आले.

■ छाया । अनिल खाटेर



प्रस्थान सोहळ्यात घोगस पारगावच्या लेझीम पथकाने आकर्षक डाव सादर करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पालखी प्रस्थानावेळी साईगुलाब व दोस्ती बँड यांनी संत भगवानबाबांच्या जीवनचरित्रावर आधारित भक्तिगीते सादर केली. भगवानबाबांच्या जयघोषाने संपूर्ण भगवानगड परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

# पारनेरच्या खिंडीतील गणेश मंदिराचा २९५ वर्षांपूर्वीचा शिलालेख

**विजयादशमीच्या शुभदिनी मंदिर पूर्णत्वाची ऐतिहासिक नोंद | पारनेर तालुक्यातील पुनवडी येथील गणेश मंदिराच्या भिंतीत मराठाकालीन शिलालेख**

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर | वीरभूमी –** जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पुनवडी येथील खिंडीतील गणेश मंदिराच्या बाह्य भिंतीवर कोरलेला एक प्राचीन शिलालेख मराठाकालीन धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरत आहे. शके १६५३ म्हणजेच इ.स. १७३१ मध्ये विजयादशमीच्या शुभदिनी मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याची नोंद या शिलालेखात आढळते.

पारनेर गावापासून सुमारे ४ किलोमीटर अंतरावर असलेल्या पुनवडी येथील खिंडीतील गणेश मंदिराच्या दक्षिण बाजूच्या बाह्य भिंतीवर, पायाच्या थरात हा शिलालेख बसविण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा शिलालेख बसविताना तो चुकून उलटा बसविण्यात आला आहे. कोरीव स्वरूपातील हा लेख देवनागरी लिपीतील मराठी भाषेत असून त्यामध्ये पाच ओळी आहेत. काळाचा परिणाम, वातावरणामुळे झालेली झीज आणि मंदिरावर वेळोवेळी झालेल्या रंगरंगोटीमुळे काही अक्षरे अस्पष्ट झाली आहेत. मात्र शिलालेखाचा छाप घेतल्यास त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचता येतो.

शिलालेखाचे वाचन :

१. ।।श्री गजानन चरणी विनित त्रंब

२. क सुत बंकाजि पंत स्वामी सुभा

३. नजि थोरात सांप्रत सेवक प्रल्हाद सखा

४. जि सके १६५३ विरोधकृत संवत्सर मा

५. स आस्विन विजया दशमि देवालय पूर्णः

**शिलालेखाचा अर्थ :** श्री गजाननाच्या चरणी विनम्र भावनेने भक्ती करणारे श्री त्र्यंबक यांचे पुत्र बंकाजी पंत स्वामी, सुभानजी थोरात आणि त्यांचे सेवक प्रल्हाद सखाजी यांनी शालिवाहन शक १६५३, विरोधकृत नाम संवत्सर, आश्विन महिन्यातील शुद्ध दशमी म्हणजेच विजयादशमी (दसरा) या शुभदिनी देवालयाचे काम पूर्ण झाल्याची नोंद या लेखामध्ये केली आहे.

हा शिलालेख अठराव्या शतकाच्या पूर्वार्धातील धार्मिक जीवन आणि मंदिरनिर्मितीच्या परंपरेवर प्रकाश टाकणारा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. शिलालेखाच्या सुरुवातीलाच श्री गजानन चरणी विनीत असा उल्लेख आढळतो. यावरून तत्कालीन समाजात देवालय निर्मितीला धार्मिक पुण्यकर्माचे स्वरूप प्राप्त होते, हे स्पष्ट होते.

शिलालेखात बंकाजी पंत स्वामी, सुभानजी थोरात आणि सेवक प्रल्हाद सखाजी या व्यक्तींची नावे नमूद आहेत. त्यामुळे मंदिर उभारणीत स्थानिक प्रतिष्ठित व्यक्तींसह सेवक वर्गाचाही सहभाग होता, हे दिसून येते. मंदिरनिर्मिती ही केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर सामूहिक प्रयत्नातून पूर्ण झालेली धार्मिक सेवा होती, याची





साक्ष हा लेख देतो.

शलालेखातील कालोल्लेखानुसार शालिवाहन शक १६५३, विरोधकृत नाम संवत्सर, आश्विन शुद्ध दशमी, बुधवार हा दिवस नमूद करण्यात आला आहे. ग्रेगोरियन कालगणनेनुसार हा दिवस २९ सप्टेंबर १७३१ असा येतो. विजयादशमी हा विजय, शुभारंभ आणि समृद्धीचा दिवस मानला जात असल्याने मंदिराचे काम पूर्ण करण्यासाठी या शुभदिनीची निवड करण्यात आली असावी.

पारनेरच्या खिंडीतील गणेश मंदिराचा हा शिलालेख स्थानिक इतिहास, मंदिरसंस्कृती, मराठा काळातील सामाजिक रचना आणि धार्मिक परंपरांचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. तत्कालीन आश्रयदाते, धार्मिक संस्थांना मिळणारे संरक्षण, स्थानिक समाजातील संबंध आणि स्थापत्य परंपरा यांचा अभ्यास करताना हा शिलालेख महत्त्वपूर्ण प्राथमिक साधन ठरतो.

हा केवळ मंदिर पूर्णत्वाची नोंद करणारा लेख नसून अठराव्या शतकातील महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनाचा आरसा आहे.

या शिलालेखाचे संशोधन, माहिती व वाचन पुणे येथील शिलालेख वाचक अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

## ज्ञानेश्वरी ओवी पाठांतरात अनिरुद्ध धाडगे व अथर्व डाके प्रथम

**आधुनिक शिक्षणाला संतविचार व संस्कारांची जोड देणारा उपक्रम | राज्यभरातील विद्यार्थ्यांचा सहभाग**

● **शेवगाव | वीरभूमी–** शालेय शिक्षणासोबत विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्ये, संतविचार आणि अध्यात्मिक संस्कार रुजविणे ही काळाची गरज असून, आधुनिक शिक्षणाला अध्यात्माची जोड देणाऱ्या ज्ञानेश्वरी ओवी पाठांतर स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त ठरतील, असे प्रतिपादन प्रा. रमेश भारदे यांनी केले.

> ज्ञान आणि भक्ती यांचा अनोखा संगम असलेली ही स्पर्धा संत साहित्याचे गाढे अभ्यासक व रसाळ वाणीचे प्रवचनकार कै. भारदे बुवा यांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या संस्थेने आयोजित करून कै. भारदे दादा यांना अनोखी आदरांजली वाहिली आहे.
>
> – **हरीश भारदे,** सचिव, भारदे साक्षरता प्रसारक मंडळ, शेवगाव

येथील श्रुती माऊली वेदपाठ शाळा व भारदे साक्षरता प्रसारक मंडळ, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानेश्वरी ओवी पाठांतर स्पर्धेत राज्यभरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या लहान गटात अनिरुद्ध भरत धाडगे (अहिल्यानगर) यांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर मोठ्या गटात अथर्व ऋषिकेश डाके (शेवगाव) याने अव्वल क्रमांक पटकाविला.

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची तयारी चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) पासून सलग तीन महिने ऑनलाइन माध्यमातून करण्यात आली. ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अचूक उच्चार, स्पष्टता आणि अर्थपूर्ण सादरीकरणासह पाठ करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. राज्यभरातून ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. अंतिम फेरीसाठी ५१ स्पर्धक उपस्थित राहिले. यापैकी १०० पैकी १०० ओव्या अचूक पाठ करणाऱ्या विद्यार्थ्यांची विजेते म्हणून निवड करण्यात आल्याची माहिती स्पर्धा प्रमुख निलेश मोरे यांनी दिली.

लहान गटात अनिरुद्ध भरत धाडगे (अहिल्यानगर), यशश्री सोमनाथ रणमळे (शेवगाव), शिव गणेश निक्रड (पुणे), कार्तिकी गणेश चौधरी (अमरापूर) आणि मानस सोमनाथ गाढे (शेवगाव) यांनी विशेष प्राविण्य मिळविले. मोठ्या गटात अथर्व ऋषिकेश डाके (शेवगाव), उमंग वैभव दीक्षित (आव्हाणे), गौरी भरत धाडगे (अहिल्यानगर), ज्ञानदा शंकर घुगे (नाशिक), आरव योगेश पोखरकर (पुणे) आणि सिद्धीक्षा गणेश लाड (शेवगाव) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले, अशी माहिती प्राचार्य संजय कुलकर्णी यांनी दिली.

यावेळी बोलताना प्रा. रमेश भारदे यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून त्यांच्यामध्ये नैतिकता, संस्कार, अध्यात्म आणि संत साहित्याची आवड निर्माण होणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार, संयम, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव विकसित होते. अशा उपक्रमांमुळे भावी पिढी अधिक सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक म्हणून घडण्यास मदत होईल.

## सौ. दिपाली बंग यांच्या पाठपुराव्याने आषाढी वारीपूर्वी सखाराम महाराज मठासमोरील हायमॅक्स सुरू

● **पाथर्डी | वीरभूमी–** आषाढी एकादशीनिमित्त अमळनेर ते पंढरपूर दिंडी येत्या दोन दिवसांत पाथर्डी शहरातून मार्गक्रमण करणार असल्याने शेवाळे गल्ली येथील सखाराम महाराज मठासमोरील अनेक दिवसांपासून बंद असलेला हायमॅक्स दिवा अखेर दुरुस्त करण्यात आला. माजी उपनगराध्यक्ष तथा माजी नगरसेविका सौ. दिपाली रामनाथ बंग यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.


■ छाया | अनिल खाटेर

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सखाराम महाराज मठ परिसरात वारकरी, भाविक आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. मात्र, हायमॅक्स बंद असल्याने रात्रीच्या वेळी परिसर अंधारात राहून सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. ही बाब लक्षात घेऊन सौ. दिपाली बंग यांनी पाथर्डी नगरपरिषदेच्या विद्युत विभागाकडे तातडीने हायमॅक्स सुरू करण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत नगरपरिषदेचे विद्युत विभाग प्रमुख अरुण तोगे यांच्या मार्गदर्शनाखाली देखभाल व दुरुस्तीचे ठेकेदार दानिश आतार यांच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन हायमॅक्सची दुरुस्ती केली. या कामात बापूसाहेब चांदणे, ऋषिकेश पवार, उमेश केदार आणि ऋषिकेश शिरसाट यांनी परिश्रम घेत हायमॅक्स पुन्हा कार्यान्वित केला.

यावेळी माजी नगरसेवक रामनाथ बंग तसेच नशीरभाई शेख, विजय उदमले, नंदकुमार दायमा, सुभाष पाचरणे आदी उपस्थित होते.

हायमॅक्स सुरू झाल्याने सखाराम महाराज मठ परिसर पुन्हा प्रकाशमान झाला असून आषाढी वारीसाठी येणाऱ्या वारकरी, भाविक आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. परिसरातील नागरिकांनी नगरपरिषदेच्या विद्युत विभागाचे तसेच सौ. दिपाली रामनाथ बंग व रामनाथ बंग यांच्या पाठपुराव्याचे कौतुक करून त्यांचे आभार मानले.

## राशिनमध्ये निधीचा अपहार व भ्रष्टाचाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण; लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

● **अहिल्यानगर | वीरभूमी–** कर्जत तालुक्यातील राशिन येथील विविध विकासकामांमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी, अपंग सहायता निधीच्या गैरवापराची सखोल तपासणी, रखडलेल्या विकासकामांना गती देणे तसेच प्रशासकीय दिरंगाईबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते कमलेश साळवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण अखेर दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.१४ जुलै) लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी दिलेल्या लेखी पत्रात, या सर्व तक्रारींची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निर्देश देण्यात आल्याचे नमूद केले आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. या लेखी आश्वासनानंतर कमलेश साळवे यांनी उपोषण मागे घेतले.

साळवे यांनी प्रशासनाकडे सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राशिन येथील विविध विभागांमार्फत राबविण्यात आलेली अनेक विकासकामे आजही अपूर्ण अवस्थेत आहेत. अनेक कामांचा दर्जा निकृष्ट असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याची शक्यता आहे. वारंवार तोंडी व लेखी तक्रारी करूनही संबंधित अधिकारी कोणतीही ठोस कारवाई करत नसून, दोषींना संरक्षण देत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

सन २०२१ ते २०२४ या कालावधीत ग्रामपंचायत राशिनकडे उपलब्ध झालेला अपंग सहायता निधी अद्याप लाभार्थ्यांसाठी खर्च करण्यात आलेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा निधी नेमका कुठे गेला, कोणाच्या आदेशाने वापरण्यात आला किंवा वळविण्यात आला का, याची सखोल चौकशी करून संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामवेश ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार या मार्गावरील डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत पंचायत समिती आणि संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याने संबंधित कामाची तांत्रिक चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. राशिन येथील बौद्ध विहारासाठी निधी मंजूर झालेला असूनही काम सुरू झालेले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने या विलंबाची कारणमीमांसा करून मंजूर काम तातडीने सुरू करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी साळवे यांनी केली आहे.

## एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त

# पारनेर बसस्थानकात वृक्षारोपण

**नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे यांच्या हस्ते रोपांची लागवड**

● **पारनेर | वीरभूमी –** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी राज्यभर वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. त्याअंतर्गत पारनेर आगाराच्या वतीने पारनेर बसस्थानक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

आगार व्यवस्थापक प्रशांत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे यांच्या हस्ते विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन आणि हरित महाराष्ट्राच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी एसटी महामंडळाने राज्यभरातील विभागीय कार्यालये, आगारे व बसस्थानक परिसरात हा उपक्रम राबविला.


■ छाया | भगवान गायकवाड

यावेळी बोलताना डॉ. कावरे म्हणाल्या, एसटीच्या वर्धापन दिनानिमित्त राबविण्यात आलेला हा उपक्रम पर्यावरण संरक्षणासोबत सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीवही अधिक दृढ करणारा आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेची विशेष बाब म्हणजे केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या रोपांच्या नियमित संगोपनाची जबाबदारीही निश्चित करण्यात आली. पर्यावरण संरक्षणाचा हा संकल्प सातत्याने राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास एसटी महामंडळाचे वरिष्ठ सहाय्यक सागर लोंढे, लिपिक सुरेश औटी, वाहतूक निरीक्षक जगदीश कारखिले, लेखाकार बद्दर मॅडम, बसापुरे मॅडम, वाहतूक निरीक्षक गिरीश वाखारे, वाहतूक नियंत्रक जितेंद्र शेळके यांच्यासह पारनेर आगारातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवासी सेवेसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देणारा हा उपक्रम ठरला असून, वृक्षारोपणामुळे पारनेर बसस्थानक परिसर भविष्यात अधिक हिरवागार आणि आकर्षक होण्यास मदत होणार आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com